# त्या शिर नसलेल्या धडाची ओळख पटली

## 5 लाखांच्या आर्थिक व्यवहारातून सैनिकाने केली हत्या ● मृतक भुगांव येथील रहिवासी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.29)**– खोलापुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील म्हाडा कॉलनीजवळील झाडाझुडुपात शिर नसलेला मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती. आरोपीने हत्या करून शिर हे धडापासून वेगळे केल्याचे दिसून आले होते. हा मृतदेह दुर्योधन बाजीराव कडू (64, रा. भुंगाव, अचलपूर) यांचा असल्याचे निष्पन्न झाले असून, याप्रकरणात पोलिसांनी सैन्यात असलेल्या निकेतन रामेश्वर कडू नामक इसमाला ताब्यात घेतले आहे. पाच लाखांच्या उधारीचा तकादाने त्रस्त झाल्यामुळे आरोपीने ही निर्घुणपणे हत्या केल्याचे पोलिस चौकशीत पुढे आले आहे.



अकोली गावानजीक असणाऱ्या म्हाडा कॉलनीजवळील परिसरात 28 नोव्हेबर रोजी सकाळी एका अज्ञात व्यक्तीचा शिरच्छेद केलेला मृतदेह आढळून आला. हा छिन्नविछिन्न झालेला मृतदेह पाहून परिसरात मोठी खळबळ उडाली होती.

या घटनेच्या माहितीवरून खोलापुरी गेट पोलिसांसह शहर पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारवकर, क्राईमची पथके घटनास्थळी पोहोचली होती. पोलिसांनी घटनास्थळावरून एक धारदार सत्तूर, चष्मा, चप्पल आणि एक तंबाखूची पुडी जप्त केली. या ब्रँडचा तंबाखू परतवाडा आणि अचलपूर संकुलातील ग्रामीण भागात वापरला जातो. तसेच मृतक व्यक्ती हा ग्रामिण भागातील असल्याचे पोलिसांना आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी या दिशेने तपास सुरु केल्यानंतर मृताची ओळख दुर्योधन बाजीराव कडू (64) नावाने झाली.

### पाच लाखांच्या उधारीचा तकादा बेतला जीवावर

दुर्योधन कडू यांनी भारतीय सैन्यात कार्यरत असलेला निकेतन कडू याला पाच लाख रुपये उधार दिले होते. हे पैसे परत मिळावे, या उद्देशाने दुर्योधन हा गावातील निकेतन कडू यांच्याकडून वारंवार पैसे मागत होता. परंतु निकेतन हा पैसे परत करण्यास टाळाटाळ करीत होता. दुर्योधनच्या या त्रासाला निकेतन कंटाळला होता. त्यामुळे दुर्योधनला संपविण्याचा निर्णय निकेतन कडूने घेतला. सकाळी 10.30 च्या सुमारास दुर्योधन कडू हे गावातील एका ठिकाणी भेटले आणि तेथून दोघेही वाहनात बसून अमरावतीकडे निघाले. त्यानंतर त्याने म्हाडा कॉलनीत दुर्योधन कडूची हत्या करून शिर कापले असावे, असा कयास पोलिसांनी लावलेला आहे.

म्हाडा कॉलनीत शिर नसलेल्या मृतदेहाची ओळख पटली असून, उधारीच्या पैशांवरून ही हत्या झाल्याचे दिसून येत आहे. आरोपीला ताब्यात घेतले असून, चौकशी सुरु आहे. अद्यापपर्यंत मृताचे शिर सापडले असून, पोलिस शोध घेत आहेत.

**गणेश शिंदे,**
**पोलिस उपायुक्त.**

### दुर्योधनच्या शिर अद्याप सापडले नाही

मृताची ओळख दुर्योधन कडू नावाने झाल्यानंतर आरोपीही निष्पन्न झाला. त्यामुळे पोलिसांनी निकेतन कडूचा शोध सुरू केला होता. निकेतन कडू हा गेल्या दोन दिवसांपासून सातत्याने बेपत्ता असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी निकेतनचा शोध घेऊन, त्याला 29 नोव्हेबर रोजी रात्री ताब्यात घेतले. पोलिस त्याची चौकशी करीत आहे. परंतू त्याने दुर्योधन कडूचे शिर कुठे फेकले, ही बाब अद्याप पुढे आली नाही. त्यामुळे पोलिस दुर्योधनच्या शिराचा शोध घेत आहेत.

# पन्नास हजाराची लाच मागणाऱ्या दोन पोलिस शिपायांना अटक

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.29)** – गुन्हे दाखल करण्यापासून वाचायचे असेल, तर 5 लाख रुपये द्यावे लागेल, अशी भिती दाखवून तडजोडीअंती 50 हजाराची लाच स्विकारण्याचे मान्य करणार्या फ्रेजरपुरा ठाण्याच्या दोन पोलिस शिपायांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने 29 नोव्हेबर रोजी अटक केली. सतिश सुभाष सावरकर (39, ब.नं. 591 रा. मंदार बिल्डींग क्वॉटर नं.2, शासकीय वसाहत, कांता नगर, अमरावती) व अनिरूध्द नामदेवराव भिमकर (33, रा. कैलास नगर, महादेव खोरी, अमरावती) अशी आरोपी लोकसेवकांची नावे आहेत.



अमरावती शहरातील तक्रारदार यांनी 15 ऑक्टोबर रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो यांच्याकडे दिली की, त्यांचे मंगलधाम येथील न्यु कॉलनीत जुन्या घराच्या नुतनीकरणाचे काम सुरू आहे. तेथे दामिनी पथकाचे कर्मचारी आले आणि %तु या ठिकाणी अवैध धंदे चालवितो% असे म्हणुन त्यांनी घराचे फोटो काढले. तसेच त्यांचा भाऊ मिलींद उर्फ विक्की बाबर याला फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात नेले. पोलिसांनी तक्रारदारास पोलीस स्टेशनला येण्यास सांगीतले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांना फ्रेजरपुर्याचे पोलिस शिपाई सतिश सुभाष सावरकर यांनी फोन करून सांगीतले की, %तुझ्या भावावर व तुझ्या पुर्ण कुंटुबावर गुन्हा दाखल करतो, यातुन तुला वाचायचे असेल, तर साहेबांना 5 लाख रुपये दयावे लागतील% अशी भिती दाखवून गुन्हा दाखल न करण्यासाठी त्यांनी तक्रारकर्त्याला 5 लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली आहे. या तक्रारीवरून एसीबी पथकाने 15 ऑक्टोबर रोजी पंचासमक्ष पडताळणी कार्यवाही केली असता, पोलीस अमंलदार सतिश सावरकर व अनिरूध्द भिमकर यांनी तक्रारदार यांना त्यांच्या भावावर व पुर्ण कुंटुबावर गुन्हा दाखल करतो अशी भिती दाखवून गुन्हा दाखल न करण्यासाठी तडजोडीअंती 50 हजार रुपयांची लाचेची मागणी केली आणि लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले आहे. परंतू आरोपी लोकसेवकांना तक्रारदार यांच्यावर संशय आला. त्यामुळे त्यांनी तक्रारदाराकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. परंतू लाचेची मागणी केल्यामुळे एसीबी पथकाने दोन्ही आरोपी लोकसेवकांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे, पोलीस उपअधिक्षक अभय आष्टीकर, मंगेश मोहोड, संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक योगेशकुमार दंदे, केतन मांजरे, पोलीस अंमलदार आशिष जांभोळे, प्रमोद रायपुरे, शैलेश कडू, उपेंद्र थोरात व चालक पोलिस हवालदार चंद्रकांत जनबंधू यांनी पार पाडली.

# बेलोरा गावातील नाल्यात आढळला मानवी सांगाडा

## बडनेरा शहरात उडाली खळबळ



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.29)** – बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बेलोरा गावाजवळ असणार्या नाल्यात 29 नोव्हेबर रोजी सायंकाळी मानवी सांगाडा सापडल्याने खळबळ उडाली आहे. मानवी सांगाड्यावर केवळ कपडेच उरलेले होते. त्यामुळे मृताची ओळख अद्याप पटलेली नाही. पोलिसांनी मृताची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत.

29 नोव्हेबर रोजी सकाळी बेलोरा-दाभा परिसरातील नाल्याच्या झुडपातून एका अज्ञात व्यक्तीचा संपूर्ण कुजलेला मृतदेह जवळपास सांगाड्याच्या अवस्थेत सापडला. या घटनेच्या माहितीवरून बडनेरा पोलिसोनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाची परिस्थिती पाहून मृत व्यक्तीची ओळख पटवणेही कठीण असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मानवी सांगाडा एकत्रित करून, शवविच्छेदनाच्या अनुषंगाने रुग्णालयात पाठविला. पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे.

### बैल शोधण्यासाठी गेलेल्यांना दिसला सांगाडा

माहितीनुसार, बेलोरा परिसरातील राहणारा एक व्यक्ती आपला बैल शोधत होते. तो त्याच्या ओळखीच्या काही लोकांसह संपूर्ण परिसरात आपल्या बैलाचा शोध घेत होता. या तपासणीदरम्यान सर्वजण आवारातून वाहणाऱ्या नाल्याकडे गेले, त्यावेळी त्यांना मानवी सांगाडा दिसला. त्यामुळे बेलोरा व दाभा परिसरात एकच खळबळ उडाली.

### मृताची ओळख पटविण्याचे पोलिसांसमोर आव्हान

मृतदेहाचे रुपातंर सांगाड्यात झाल्याने दुर्गंधी येत नसल्याचे आढळून आले. त्यावरून अंदाज आला की, मृतदेह जवळपास दोन महिने त्या ठिकाणी पडून आहे. दोन महिन्यापूर्वी या व्यक्तीचा मृत्यू झाला असावा, त्यामुळे त्याचे मांस पूर्णपणे कुजून चिखलात बदलले असावे. मृताच्या अंगावर हाफ पँट आणि पिवळा टी-शर्ट आढळून आला. त्याचा चेहरा पूर्णपणे विद्रूप झाला आहे. अशा परिस्थितीत मृताची ओळख पटवणे आता पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. कारण या कालावधीत अमरावती मंडळातून या वर्णनाची एकही व्यक्ती बेपत्ता झाल्याची तक्रार आलेली नाही.

# चंदू उर्फ उमेश यावलकर यांना मंत्री पद द्या!

## विदर्भातील माळी समाजाने केली देवेंद्र फडणवीसांकडे मागणी

**विलास पाटील**

**वरुड (दि.29)**– विदर्भातील एकमेव माळी समाजाचे आमदार म्हणून वरुड – मोर्शी विधानसभेचे चंदू उर्फ उमेश यावलकर आहे. म्हणून त्यांना मंत्रिपद द्या अशी मागणी विदर्भातील माळी समाजाने राज्याचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे, आता ते या समाजाची दखल घेणार का असा प्रश्न निर्माण झाला आहे आणि घेतली तर चंदू उर्फ उमेश यावलकर यांना मंत्रिपद मिळेल अशी आशा माळी समाजातील नागरिकांना आहे.



अमरावती जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदार संघापैकी एकमेव विधानसभा मतदारसंघ म्हणून वरून मोर्शी विधानसभेची उमेदवारी माळी समाजाचे कार्यकर्ते चंदू उर्फ उमेश यावलकर यांना भारतीय जनता पार्टीने दिली आणि ते निवडूनही आले आणि आमदार झाले. जिल्ह्यातील अचलपूर मतदार संघातील स्व. विनायक कोरडे हे एकमेव माळी समाजाचे मंत्री म्हणून भाजपाने अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री केले होते. त्यानंतर आजपर्यंत एकही मंत्री म्हणून अमरावती जिल्ह्यामध्ये माळी समाजाचे झाले नाही, आज ती परिस्थिती जरी नसली तरी मात्र भारतीय जनता पार्टीने वरुड-मोर्शी विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी माळी समाजाचे कार्यकर्ते म्हणून चंदू उर्फ उमेश यावलकर यांना दिली व ते निवडूनही आले, त्यामुळे त्यांना अमरावती जिल्ह्यामध्ये मंत्री म्हणून महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी विदर्भातील संपूर्ण माळी समाजातील नेते व सामाजिक कार्यकर्ते यांनी राज्याचे भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. आता देवेंद्र फडणवीस या प्रकरणाची दखल घेऊन एकमेव माळी समाजाचे विदर्भातील एकमेव आमदार म्हणून वरुड मोर्शी विधानसभेमध्ये मंत्रीपद देणार का याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागलेले आहे.

वरुड – मोर्शी विधानसभेचा इतिहास पाहता आतापर्यंत महादेवराव आंडे वगळता एकही आमदार हा माळी समाजाचा झालेला नाही आतापर्यंत माळी समाजाने अनेकांना आमदार केले विशेषतः डॉ. अनिल बोंडे यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतर पूर्णतः माळी समाज हा भाजपमय झाला असे म्हटले तर काही गैर नाही. तो समाज सतत एकनिष्ठ डॉक्टर अनिल बोंडे यांच्यासोबत भाजपमध्ये राहिला, दुर्दैवाने डॉ. बोंडे हे 2019 च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पराभूत झाल्यानंतर त्यांची वर्णी राज्यसभेवर लागली आणि भाजपाची जागा या मतदार संघामध्ये रिक्त झाली. त्याचाच लाभ घेऊन चंदू उर्फ उमेश यावलकर यांना 2024 च्या विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाने उमेदवारी देऊन उच्चांकी मतदानाने निवडून दिले. त्यामुळे माळी समाजाच्या आशा आता पल्लवीत झाल्या असून स्व. विनायकदादा कोरडे यांच्यानंतर चंदू उर्फ उमेश यावलकर यांना भाजपाने मंत्रीपद द्यावे अशी मागणी जोर धरू लागली आहे या मागणीची दखल भारतीय जनता पार्टी निश्चितच घेणार अशी आशा डॉ. अनिल बोंडे, बालू मुरूमकर, श्रीधर सोलव, राजकुमार राऊत, इंद्रभूषण सोंडे, अर्चना मुरूमकर, रूपाली सोंडेसह तालुक्यातीलच नव्हे तर संपूर्ण विदर्भातील माळी समाजाच्या नागरिकांना आहे.

# शेताचे मोजमाप करताना वाद

**अमरावती**– खल्लार पोलीस ठाणे हद्दीत कसबेगव्हाण येथील रहिवासी मोईन मोहम्मद इक्बाल मोहम्मद यांच्या शेताचे मोजमाप भूमी अभिलेख कार्यालयाकडून सुरू होते. यावेळी सुभाष शिंगणे, अनिकेत गोमासे, शरण्य शिंगणे, पियुष शिंगणे, गजानन शिंगणे, प्रदीप शिंगणे यांनी वाद करून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. मोईन मोहम्मद इक्बाल यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.तसेच याप्रकरणी सुभाष शिंगणे यांच्या फिर्यादीवरून मोईन मोहम्मद इक्बालसह अन्य पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दोन्ही गटाकडून एकमेकांच्या विरोधात तक्रार देण्यात आली आहे. या घटनेचा पुढिल तपास खल्लार पोलीस ठाण्याचे ठाणेदाराचया मार्गदर्शनात पोलीस करीत आहे.

# सरपंचाच्या पतीला मारहाण

**अमरावती** – घरासमोर शिवीगाळ का करता, असे विचारले असता आरोपींनी सरपंच महिलेच्या पतीला मारहाण केली. महिला सरपंचाच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ग्राम उदखेड येथे ही घटना 27 नोव्हेंबर रोजी घडली आहे. आरोपी युगुल प्रदीप सोळंके, प्रदीप रामराव सोळंके नेहमी विनाकारण शिवीगाळ करत असल्याचे तक्रारीत नमुद आहे.

# लोखंडी प्लेट चोरणारी टोळी पकडली

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि. 29)** – बंधाऱ्यातील पाणी अडविणेकरीता वापरण्यात येणाऱ्या लोखंडी प्लेटा चोरणारी टोळी वरुड पोलिसांनी ताब्यात घेतली असून त्यांचेकडून मुद्देमाल सुध्दा जप्त केला आहे. वरुड पोलिसांनी केलेल्या या कामगिरीचे सर्वत्र कौतूक केल्या जात आहे.



पोलीस स्टेशन वरुड हद्दीतील मोरचुंद ते चिंचरगव्हाण रोडवरील बंधाऱ्यातील पाणी अडविणेकरीता वापरण्यात येणाऱ्या 61 लोखंडी प्लेटा किंमत अंदाजे 2 लाख 90 हजार रुपयांच्या मोरचुंद स्मशान भुमीजवळ ठेवलेल्या चोरी गेल्याचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन वरुड येथे अज्ञात चोराविरुध्द कलम 303 (2) बीएनएस प्रमाणे नोंद केला. ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांनी नमुद गुन्हयाचे तपासकामी पोलिस उपनिरिक्षक दिपक दळवी, पो.हे.कॉ.विनोद पवार, पो.कॉ.राम बदने यांना गुन्हा उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे त्यांनी गुन्हयाचा तांत्रिक तपास करुन व गोपनिय बातमीदार नेमुन माहीती घेवुन आरोपी कुलदिपसिंग दर्शनसिंग जुनी (29) रा.प्लॉट नं.6 बीडगाव नागपुर, युवराज लालचंद ठाकरे (32) रा.पोवारी नगर, भंडारा रोड नागपुर यांना ताब्यात घेवुन विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी नमुद चोरी केल्याचे तसेच पो.स्टे.वरुड, मोर्शी येथील गुन्हे केल्याची कबुली दिल्याने त्यांचेकडुन साबीत 29 लोखंडी प्लेट व 230 मोडतोड केलेल्या लोखंडी प्लेटचे तुकडे असा अंदाजे 5 लाख 12 हजार रुपयांचा माल व लोखंडी प्लेट चोरी करण्याकरीता वापरलेले मालवाहु वाहन क्र.एम.एच.40 बीएल 1784 किंमत अंदाजे 10 लाख रुपयांचा असा एकूण 15 लाख 12 हजार रुपयांचा माल जप्त केला असून सद्य आरोपी पोलिस कोठडीमध्ये असून त्यांचेकडून 4 गुन्हे उघडकीस झाले असुन आनखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वरुड पोलीसांनी वर्तविली आहे.


सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरिक्षक दिपक दळवी, पो.हे.कॉ.विनोद पवार, पो.कॉ.राम बदने, सचिन भगत राजु चव्हाण, किरण दहिवाडे तसेच पो.स्टे.सायबरचे पो.हे.कॉ सागर धापड, पो.कॉ.चेतन गुल्हाने, रितेश वानखडे, गुणवंत सिरसाट यांचे मदतीने केली. पुढील तपास ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरिक्षक दिपक दळवी करीत आहे.

# रोजगारा अभावी गावे झालीत रिकामी

## रोजगार हमी योजनेचे काम सुरू करण्याची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,(दि.29)** – चिखलदरा तालुक्यात रोजगार हमी योजनेची कामे अद्याप सुरू न झाल्यामुळे आता मजुरांचे स्थलांतर सुरु झाले आहेत. त्यामुळे गावचे गावं रिकामी व्हायला सुरुवात झाली आहे. मेळघाटातील घरे रिकामी झालेली दिसत आहेत. येथील रोजगार हमी योजनेची कामे तातडीने सुरु करण्याची मागणी मजूरांकडून होत आहे.



मेळघाटात विशेष करून चिखलदरा तालुक्यात मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. येथे दरवर्षी कोट्यवधी रुपयांची कामे होतात. दिवाळी नंतर मजुरांच्या हाताला काम नसल्यामुळे आता स्थलांतर व्हायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे मजुरांचे अमरावती, बडनेरा, अकोला तसेच वीटभट्टीसाठी प्रसिद्ध असलेल्या चोहट्टा बाजार येथे ग्रामस्थ रोजगाराचा शोधात निघाले आहेत. चिखलदरा तालुक्यातील खटकाली या गावाची लोकसंख्या 650 आहे. त्यापैकी अर्धेअधिक ग्रामस्थ आपल्या घराला कुलुप लावून कुटुंबासह स्थलांतरित झाल्याचे भयावह चित्र पहावयाला मिळत आहे. शाळेतील उपस्थिती वरही याचा परिणाम दिसून येत आहे. मुलांचे शिक्षण बुडत आहे. त्यामुळे शासनाने त्वरित रोजगार हमी योजनेची कामे सुरू करावी अशी मागणी मजूर वर्गाकडून होत आहे. खरीप हंगाम संपल्यावर आमच्या हाताला रोजगार नाहीत, त्यामुळे आम्हाला माजबुरीने रोजगाराच्या शोधार्थ शहराकडे



वीटभट्टी वर कामासाठी धाव घ्यावी लागत असल्याचे खटकाली गावातील तसेच इतरही गावातील मजुरांनी सांगितले.

आम्ही तालुक्यातील सर्व यंत्रणेला पत्र दिली आहेत. रोजगार हमी योजनेच्या कामाला सुरुवात झालेली आहेत. जिथं कोठे काम सुरु झाली नसतील, तेथील कामाचा आढावा घेऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करायला सांगतो.

**जीवन मोरणकर**
**तहसीलदार, चिखलदरा.**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४